**आकाशवाणी नागपूर,**
**(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शुक्रवार, दिनांक २१ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **योग हा समाजात सकारात्मक बदलाचे नवे मार्ग तयार करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जागतिक योग दिन कार्यक्रमात प्रतिपादन.**
- **शारीरिक व मानसिक सुदृढतेसाठी योग आवश्यक- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं नागपुरात प्रतिपादन- नागपूरसह विदर्भात ठीक ठिकाणी बहुविध कार्यक्रमांनी योग दिवस साजरा.**
- **महाराष्ट्र पोलीस दल अधिक कार्यक्षम करण्यासाठी 'एआय'चा वापर करण्यात येणार-गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती; आय.आय.एम.नागपूर यांच्या सोबत तयार केला प्रकल्प.**
- **महाज्योती नागपूर मार्फत मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्गासाठी ३ जुलै पर्यंत अर्ज भरता येणार.**

*****

योग दिवस

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन आज देशभरात उत्साहात साजरा होत आहे. ‘स्वत:साठी आणि समाजासाठी योग’, ही यंदाच्या योग दिनाची संकल्पना आहे. यानिमित्त आज सकाळी देशभरात विविध ठिकाणी, शाळा-महाविद्यालयं तसंच शासकीय कार्यालयांमध्ये योग शिबिरांचं आयोजन करण्यात आलं होतं. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जम्मू काश्मीरमध्ये श्रीनगर इथं झालेल्या मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी झाले होते. योग हा समाजात सकारात्मक बदलाचे नवे मार्ग तयार करत असल्याचं ते यावेळी म्हणाले. गेल्या दहा वर्षात योग हा आपल्या मर्यादित परिघातून बाहेर पडला असून, जगभरात योगाच्या लाभाबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढत असल्याचं, त्यांनी नमूद केलं. तंदुरुस्ती, निकोप आरोग्य आणि निरामयतेसाठी योग आवश्यक असल्याचं सांगत, योगाभ्यासाला दैनंदिन जीवनाचा एक भाग बनवण्याचं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलं. या भाषणानंतर पंतप्रधानांसह जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी योगाभ्यासात

सहभागी झाले होते. दिल्ली इथं, केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव तसंच परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, मथुरेत संरक्षण मंत्री राजनाथसिंह, नागपूर इथं परिवहन मंत्री नितीन गडकरी, यांनी योग दिनाच्या उत्सवात सहभाग नोंदविला. तर मुंबईत राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवनात, वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांनी योगाभ्यास प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. मंत्रालयात घेण्यात आलेल्या योग शिबिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. योग ही जीवनपद्धती सर्वांनी अंगिकारली तर नक्कीच सुदृढ नागरिक घडू शकतात, सुदृढ नागरिक ही राज्याची संपत्ती असल्याचं, मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सैन्यदलात पायदळाच्या सैनिकांनी लडाख मध्ये तर नौदलानं आयएनएस विक्रांतवर योगासनं केली.

योग दिवस-नागपूर/विदर्भ

आज नागपूरसह विदर्भात वैविध्य पूर्ण कार्यक्रमांनी योग दिन साजरा करण्यात आला. मानवी जीवनात योगासनाचं अनन्यसाधारण महत्व आहे. निरोगी आणि आनंददायी जीवन जगण्यासाठी तसच शारीरिक आणि मानसिक सुदृढ आरोग्यासाठी नियमितपणे योगसाधना करण आवश्यक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपुरात केलं. नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमानं जागतिक योग दिनानिमित्त सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचं आयोजन धंतोली स्थित यशवंत स्टेडियम इथं करण्यात आलं होतं, त्यावेळी गडकरी बोलत होते. आमदार टेकचंद सावरकर, आणि कृष्णा खोपडे, यांच्यासह मोठ्या संख्येनं शासकीय कर्मचारी, योग अभ्यासक, युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक, एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. केंद्रीय संचार ब्यूरो, नागपूर, वजह फाउंडेशन आणि एल.ए.डी. महाविद्यालय यांचा संयुक्त विद्यमानं आज नागपूरात एल.ए.डी. महाविद्यालय इथं जागतिक योग दिवसाचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात शेकडो तरुण-तरुणींनी सहभाग घेतला. संस्कृती मंत्रालयाअंतर्गत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या परिसरात जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळातर्फे आज योग दिवस साजरा करण्यात आला. नागपूरच्या प्रादेशिक आयुर्वेद संशोधन संस्थेतर्फे सामाईक योग प्रोटोकॉल म्हणून ओळखले जाणारे 45 मिनिटांचं योग प्रात्यक्षिक दाखविण्यात आलं. रामटेकच्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा योग विज्ञान आणि समग्र स्वास्थ्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन रामटेक इथल्या मुख्यालयात संपन्न

झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून रामटेक चे नवनिर्वाचित खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.हरेराम त्रिपाठी होते. यावेळी योगविभागाच्या विद्याथ्यांनी योग प्रात्यक्षिक सादर केलीत. नागपूर आकाशवाणीच्या प्रांगणात आज शपथ घेऊन आणि योगासनं करून योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी योग अभ्यासक प्रवीण डब्ली यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं. नागपूरच्या सोनेगाव इथल्या वायूसेनेच्या कार्यालयात देखील योग दिन साजरा करण्यात आला. वाशीम जिल्हा प्रशासन आणि वाशीम जिल्ह्यातील विविध योग संघटनांच्या संयुक्त विद्यमानं स्थानिक वाटाणे लॉन इथ योग दिन साजरा केला गेला. आंतरराष्ट्रीय योग दिनाचं औचित्य साधून अमरावती पोलीस आयुक्त कार्यालयात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी प्रवीण आखरे यांनी आज तब्बल अडीच मिनिटं पाण्याच्या तळाशी जाऊन विविध प्रकारचे योग आणि प्राणायाम सादर केलेत. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अमरावती जिल्ह्यातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात योगासन, सूर्यनमस्कार आणि विविध आसनं करून योग दिवस साजरा करण्यात आला याच पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त कार्यालयात कार्यरत असणारे पोलीस कर्मचारी प्रवीण आखरे यांनी पोलीस आयुक्तालयातील जलतरण तलावात पाण्यावर तरंगत आणि पाण्याच्या तळाशीजाऊन विविध प्रकारचे योग व्यायाम सादर केले. वर्धा इथं महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात योग दिनाच्या निमित्ताने विश्वविद्यालयातील मेजर ध्यानचंद क्रीडांगणावर योग दिनाचं आयोजन करण्यात आलं होतं. आपल्या आरोग्याची काळजी केवळ योगाच घेऊ शकते, त्यामुळे योगाचं महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आज योग सर्वत्र पोहचला असून भारताच्या या प्राचीन योगाला संपुर्ण जगाने स्विकारले आहे, असं प्रतिपादन आमदार डॉ. पंकज भोयर यांनी आज वर्धा इथं केलं. न्यू इंग्लिश हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या रंग मंदीर प्रांगणात “स्वयं और समाज के लिए योग” या संकल्पनेवर आधारीत १० व्या जागतिक योग दिन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते. गडचिरोलीत एटापल्ली तालुक्यातील अतिदुर्गम, आदिवासीबहुल आणि नक्षलग्रस्त हेडरी येथे लॉयड मेटल्स कंपनीच्या वतीने सामूहिक योगासने करण्यात आली. तर अकोल्यात देखील मोठ्या उत्साहात आज योग दिन साजरा करण्यात आला. अकोल्यातील वसंत देसाई क्रीडांगण येथील जल तरणतलावात अनेक वर्षांपासून येथील हौशी जल तरण पटू पाण्यात योगा करून योग दिवस साजरा करतात. बुलडाणा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बुलढाणा शहरामध्ये प्रेक्षागार मैदानावरील या सोहळ्यात बुलढाणा

विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड सहभागी झाले. प्रत्येक नागरिकानं दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहन अपर चंद्रपूर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केलं.

निवडणूक तयारी

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्रासह हरयाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. हरयाणात ३ नोव्हेंबर रोजी, झारखंडमधे २६ नोव्हेंबर रोजी तर महाराष्ट्रात ५ जानेवारीला विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ संपत असल्यानं तिथं निवडणुका होत आहेत. तसंच जम्मू काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातही विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी दुसऱ्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासाठी १ जुलै २०२४ हा अर्हता दिवस आहे.

नीट

वैद्यकीय प्रवेशासाठी नीट परिक्षेनंतर होणाऱ्या समुपदेशनाला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज पुन्हा नकार दिला आहे. या प्रकरणी न्यायालयानं राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस पाठवली आहे. सर्वोच्च न्यायालयानं नीट परिक्षेतल्या गैरव्यवहारांच्या प्रकरणातल्या सर्व याचिका एकत्र करून त्यांची सुनावणी ८ जुलै रोजी करण्याचा निर्णयही घेतला आहे.

मिफ

१८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 'मिफ'चा समारोप सोहळा आज सायंकाळी पार पडणार आहे. या समारोपीय कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठीचा सुवर्णशंख पुरस्कार दिला जाणार आहे. १० लाख रुपये रोख असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. यंदा आंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागात पुरस्काराच्या स्पर्धेत तीन भारतीय माहितीपटांसह एकंदर १४ माहितीपट आहेत. याव्यतिरिक्त सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिक्शन चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट ॲनिमेशनपटाला रौप्य शंख पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. याशिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागात सर्वोत्कृष्ट छायाचित्रण, सर्वोत्कृष्ट संकलन आणि सर्वोत्कृष्ट ध्वनी आरेखन असे तीन तांत्रिक पुरस्कारही आज जाहीर होणार आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र पोलीस दल अधिक प्रभावशाली आणि कार्यक्षम करण्यासाठी आता 'एआय' चा वापर करण्यात येणार आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट, नागपूर यांच्या सोबत एक प्रकल्प तयार करण्यात आला असून या माध्यमातून गुन्ह्यांची उकल तसच कायदा आणि सुव्यवस्था राखणे, वाहतूक व्यवस्थापन यासाठी याचा वापर करता येणार असल्यची माहिती आज उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. या संदर्भात एक मॉडेल तयार करण्यात आले असून त्याचे प्रेझेंटेशन आज पोलीस दलातील काही प्रमुख अधिकाऱ्यासमोर करण्यात आलं. त्यानंतर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. 'या संदर्भात तयार करण्यात आलेली एक सरकारची कंपनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग कायदा सुव्यवस्था राखण्याकरिता आणि , गुन्ह्याची उकल करण्यासाठी करेल. याशिवाय देशातले सर्वात आधुनिक सायबर डीटेक्शन सेंटर आपण महापे, नवी मुंबई इथं तयार करत आहोत. या सर्व व्यवस्थेतून महाराष्ट्राचे पोलीस दल हे देशातले एक आधुनिक पोलीस दल असेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. दरम्यान, ज्या जिल्ह्यात पाऊस पडत आहे. तिथली पोलीस भरती पुढं ढकलण्यात आल्याचंही फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

महाज्योती

महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्था- महाज्योती नागपूर, या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती- भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण राबविण्यात येते. सन 2024-25 या वर्षातील स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी महाज्योतीनं अर्ज मागविण्याची प्रक्रिया 19 जून पासून सुरु केलेली आहे. हे अर्ज www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर मागविण्यात आले आहेत. अर्ज करण्याची शेवटची तारीख 3 जुलै असून विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचं आवाहन महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलं आहे. अधिक माहितीसाठी ०७१२-२८७०१२०/१२१ या क्रमांकावर संपर्क करावा.

******